RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १२(१९)] शुक्रवार, जुलै ४, २०२५/आषाढ १३, शके १९४७ [पृष्ठे ९, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ६२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक **०४ जुलै, २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LI OF 2025.**

A BILL

TO REGULATE CONDITION OF EMPLOYMENT AND TO PROVIDE FOR CERTAIN FACILITIES AND AMENITIES TO THE WORKERS EMPLOYED IN POWER LOOM ESTABLISHMENTS IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१.**

**महाराष्ट्र राज्यातील यंत्रमाग आस्थापनांमध्ये कामावर ठेवलेल्या कामगारांच्या नोकरीच्या शर्तींचे विनियमन करणे आणि त्यांच्यासाठी विवक्षित सुविधा आणि सोयी यांची तरतूद करणे याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील यंत्रमाग आस्थापनांमध्ये कामावर ठेवलेल्या कामगारांच्या नोकरीच्या शर्तींचे विनियमन करणे आणि त्यांच्यासाठी विवक्षित सुविधा आणि सोयी यांची तरतूद करणे इष्ट आहे, **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र यंत्रमाग कामगार (नोकरीचे विनियमन व कल्याण) अधिनियम, २०२५ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा तारखेस अंमलात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल,-

(१) "मंडळ" म्हणजे, कलम ४ अन्वये स्थापन केलेले मंडळ,

(२) "मालक" म्हणजे, जी यंत्रमाग आस्थपनेचा निकट मालक किंवा पट्टेदार किंवा भोगवटादार आहे अशी व्यक्ती,

(३) "यंत्रमाग आस्थापना" म्हणजे, ज्या ठिकाणी किंवा ज्या जागेत किंवा ज्या ठिकाणच्या किंवा जागेच्या कोणत्याही भागात यंत्रमाग सामान्यपणे चालविण्यात येत असतील ते ठिकाण किंवा ती जागा व त्यात त्यांच्या आवाराचाही समावेश होतो,

(४) यंत्रमाग कामगारांच्या संबंधात "कुटुंब" म्हणजे, अशा यंत्रमाग कामगाराच्या सोबत राहणार/री, पती-पत्नी, मुलगा, मुलगी, वडील, आई, भाऊ किंवा बहीण,

(५) "निरीक्षक" म्हणजे, कलम १० अन्वये नेमलेला निरीक्षक,

(६) "यंत्रमाग कामगार" म्हणजे, राज्यामध्ये यंत्रमाग आस्थापनेमध्ये कामावर असलेला कामगार,

(७) "विहित" म्हणजे, नियमांद्वारे विहित,

(८) "योजना" या अधिनियमाअन्वये केलेली योजना,

(९) "कामगार" म्हणजे, कोणत्याही यंत्रमाग आस्थापनेतील श्रमाचे काम करण्यासाठी, थेट किंवा कोणत्याही अभिकरणामार्फत (एजन्सी), कामावर ठेवलेली किंवा कामावर ठेवण्यात येणारी व्यक्ती-मग तिला वेतनावर ठेवण्यात आलेले असो वा नसो-आणि त्यात, मालकाने कामावर न ठेवलेल्या परंतु त्या मालकाच्या परवानगीने, किंवा मालकाशी केलेल्या करारान्वये, काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तींचा समावेश होतो, परंतु त्यात, मालकाच्या कुटुंबियाचा समावेश होणार नाही,

(१०) "वेतन" म्हणजे नोकरीच्या कराराच्या सुस्पष्ट किंवा गर्भित शर्ती पुऱ्या केल्या तर पैशाच्या रूपात व्यक्त करण्यात आलेले किंवा व्यक्त करता येण्याजोगे असे कोणत्याही यंत्रमाग आस्थापनेमध्ये केलेल्या कामाच्या संबंधात, यंत्रमाग कामगारास देय होणारे, सर्व परिश्रमिक, परंतु त्यात पुढील गोष्टींचा समावेश होणार नाही-

(एक) कोणतीही निवासव्यवस्था, वीज पुरवठा, पाणी, वैद्यकीय उपचार यांचे मूल्य,

(दोन) कोणत्याही निवृत्तिवेतन निधीला किंवा भविष्यनिर्वाह निधीला किंवा सामाजिक विम्याच्या कोणत्याही योजनेअन्वये मालकाकडून देण्यात येणारे कोणतेही अंशदान आणि त्यावर उपार्जित झालेले असेल असे व्याज,

(तीन) सेवामुक्तीनंतर देय होणारे कोणतेही उपदान.

यंत्रमाग कामगारांच्या नोकरीच्या शर्तीचे विनियमन करणे आणि त्यांच्यासाठी विवक्षित सुविधा आणि सुखसोयी करिता तरतूद करणे यासाठी योजना.

३. (१) यंत्रमाग कामगारांच्या नोकरीच्या शर्तीचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्यासाठी विवक्षित सुविधा आणि सोयी यांची तरतूद करण्यासाठी राज्य शासनास, एका योजनेद्वारे मालकांच्या आणि यंत्रमाग कामगारांच्या नोंदणीची तरतूद करता येईल आणि यंत्रमाग कामगारांच्या कामाच्या अटी व शर्ती यांची तरतूद करता येईल आणि यंत्रमाग नोकऱ्यांमधील सर्वसाधारण कल्याण विषयक बाबींसाठी तरतूद करता येईल.

(२) विशेषकरून योजनेमध्ये, पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही गोष्टींसाठी तरतूद करता येईल-

(अ) योजनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा नोंदलेल्या यंत्रमाग कामगारांच्या वर्गांना ती योजना लागू करणे,

(ब) ज्यांच्या अधीन राहून उक्त योजना नोंदलेल्या यंत्रमाग मालकांना आणि कामगारांना लागू होईल ती दायित्वे निश्चित करणे,

(क) यंत्रमाग कामगारांची भरती व त्यांना योजनेत दाखल करून घेणे या गोष्टींचे विनियमन करणे आणि नोंदणीपुस्तके ठेवणे, नोंदणी पुस्तकातील नावे तात्पुरती किंवा कायमची काढून टाकणे व नोंदणीसाठी लादवायाची फी यांसह यंत्रमाग कामगार व मालक यांची नोंदी करणे,

(ड) यंत्रमाग कामगारांच्या नोकरीचे विनियमन करणे आणि वेतनाचे दर, कामाचे तास, अतिकालीक प्रदान, प्रसूति लाभ, सवेतन रजा, उपदान, भविष्यनिर्वाह निधी, वैद्यकीय प्रतिपूर्ती, बोनस यांसाठी तरतूद आणि साप्ताहिक आणि इतर सुट्यांसंबंधीच्या शर्ती व त्या सुट्ट्यांबाबतचे पगार धरून, अशा नोकरीच्या अटी व शर्ती यांचे विनियमन करणे,

(ई) यंत्रमाग कामगार काम करीत असलेल्या ठिकाणी, आरोग्य व सुरक्षितता यासाठी उपाययोजना करणे,

(फ) यंत्रमाग कामगारांना भविष्यनिर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा योजनेचे लाभ, उपदान, इत्यादी देण्याच्या प्रयोजनार्थ, एखादा किंवा अनेक निधी स्थापन करणे, असे निधी निहित करणे, अशा निधींमध्ये करावयाचे प्रदान आणि अंशदान आणि त्यासंबंधातील इतर सर्व बाबती,

(ग) योजना अंमलात आणण्याचा खर्च कोणत्या रीतीने, कोणत्या दिवसापासून आणि कोणत्या व्यक्तींनी चुकता करावयाचा ते,

(ह) योजनेच्या प्रशासनाची जबाबदारी सोपविण्यासाठी व्यक्ती नियुक्त करणे किंवा प्राधिकरणाची स्थापना करणे आणि प्रयोजनासाठी स्थापन करण्यात आलेल्या निधीची व्यवस्था लावणे,

(य) अशा व्यक्ती किंवा प्राधिकरणे यांनी वापरावयाचे अधिकार किंवा पार पाडावयाची कर्तव्ये विनिर्दिष्ट करणे, अपिलांसाठी तरतूद करणे आणि अशा व्यक्तींच्या व प्राधिकरणांच्या निर्णयाविरुद्ध किंवा आदेशांविरुद्ध पुनरीक्षण अर्ज करणे आणि अशी अपिले व अर्ज यांवर निर्णय घेणे तसेच तद्नुषंगिक इतर बाबी,

(ज) या योजनेची प्रयोजने साध्य करण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा अनुषंगिक व पुरक बाबी.

**४.** (१) राज्य शासन **राजपत्रातील** अधिसुचनेद्वारे, "यंत्रमाग कामगार कल्याण मंडळ" या नावाने ओळखले जाणारे एक मंडळ स्थापन करील. मंडळाची रचना.

(२) असे प्रत्येक मंडळ हे, अखंड परंपरा व सामाईक मुद्रा असलेला आणि मालमत्ता संपादित करण्याचा, धारण करण्याचा व तिची विल्हेवाट लावण्याचा आणि करार करण्याचा अधिकार असणारा, उपरोक्त नावाचा एक निगम निकाय असेल त्या नावाने त्याला किंवा त्याच्यावर दावा लावता येईल.

(३) हे मंडळ, राज्य शासनाकडून वेळोवेळी नामनिर्देशित करण्यात येतील असे, मालकांचे, यंत्रमाग कामगारांचे व राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणारे सदस्य यांचे मिळून बनलेले असेल.

(४) मंडळाच्या सर्व सदस्यांचे तसेच मंडळाच्या अध्यक्षांचे नामनिर्देशन झाल्यानंतर, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, मंडळाच्या सर्व सदस्यांची नावे प्रसिद्ध करील.

(५) मंडळाच्या सदस्यांचा पदावधी नियमानुसार विहित करण्यात येईल तेवढा असेल.

(६) राज्य शासनाचे प्रतिनिधित्व करणारा सदस्य नसलेल्या प्रत्येक सदस्याला मंडळाच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी मंडळाच्या निधीतून प्रवासभत्ता व दैनिक भत्ता विहित करण्यात येईल अशा दराने देण्यात येईल.

५. मंडळाच्या बैठकी महिन्यातून किमान एकदा तरी घेतल्या जातील.

मंडळाच्या बैठकी, मंडळाचे अधिकार व कर्तव्ये.

६. (१) योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी मंडळावर असेल आणि मंडळ, योजनेद्वारे त्याला प्रदान करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील व सोपविण्यात येतील अशी कामे पार पाडील.

(२) योजनेच्या अंमलबजावणीसाठी मंडळास, त्यास योग्य वाटतील अशा उपाययोजना करता येतील.

(३) मंडळ, दर वर्षाच्या १ एप्रिलनंतर शक्य तेवढ्या लवकर आणि ३१ ऑक्टोबरच्या आत, त्या वर्षीच्या ३१ मार्च रोजी संपलेल्या गत वर्षीच्या कालावधीतील योजनेच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल राज्य शासनास सादर करील.

अशा रीतीने प्राप्त झालेला प्रत्येक अहवाल, प्राप्त झाल्यानंतर शक्य तेवढ्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवला जाईल.

लेखा आणि लेखापरीक्षा.

७. (१) मंडळ, योग्य ते लेखे आणि इतर संबंधित अभिलेखे ठेवील आणि विहित नमुन्यातील ताळेबंदासह लेखांचे वार्षिक निवेदन तयार करील.

(२) मंडळाचे लेखे, राज्य शासन यासंबंधात नियुक्त करील अशा अर्हताप्राप्त व्यक्तींकडून दरवर्षी लेखापरीक्षित केले जातील.

(३) लेखापरीक्षकाने प्रमाणित केलेले मंडळाचे लेखे आणि त्यावरील लेखापरीक्षित अहवाल दरवर्षी राज्य शासनाकडे पाठविला जाईल.

(४) लेखापरीक्षेचा खर्च, राज्य शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे मंडळाच्या निधीमधून प्राप्त केला जाईल.

मालक आणि कामगार यांच्याकडून येणे असलेली रक्कम निश्चित करणे.

८. (१) मंडळ किंवा त्याने यासंदर्भात विनिर्दिष्ट केला असेल असा अधिकारी, आदेशान्वये कोणताही मालक किंवा कामगार यांच्याकडून या अधिनियमाखालील किंवा त्याखालील कोणत्याही योजनेखाली येणे असलेली कोणतीही रक्कम निश्चित करील आणि या प्रयोजनासाठी, मंडळ किंवा असा अधिकारी, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी करील.

(२) मंडळ किंवा पोट-कलम (१) खाली चौकशी करणारा असा अधिकारी यांना, चौकशीच्या प्रयोजनासाठी, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खाली, वादाची न्यायचौकशी करण्यासाठी न्यायालयाला जे अधिकार असतात, तेच अधिकार असतील आणि अशी चौकशी ही, भारतीय दंड संहितेच्या कलम १९३ आणि २२८ च्या अर्थानुसार आणि कलम १९६ च्या प्रयोजनासाठी, न्यायिक कार्यवाही असल्याचे मानले जाईल.

(३) या कलमाखाली काढण्यात आलेला आदेश हा अंतिम असेल आणि कोणत्याही न्यायालयात त्याला आव्हान दिले जाणार नाही.

सल्लागार समिती.

९. (१) भविष्यनिर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा योजना यांच्यामधील, मालक आणि यंत्रमाग कामगार याचे अंशदान, यंत्रमाग कामगारांना द्यावयाची उपदान आणि बोनसची रक्कम आणि हा अधिनियम आणि या अधिनियमाखालील कोणतीही योजना यांची अंमलबजावणी करताना उद्भवणाऱ्या कोणत्याही बाबी यांवर सल्ला देण्यासाठी राज्य शासन, सल्लागार समिती स्थापन करील.

(२) सल्लागार समितीचे सदस्य राज्य शासनाने नियुक्त केलेले असतील आणि ते या अधिनियमाखाली तयार करण्यात आलेल्या नियमामध्ये विहित करण्यात येईल इतकी त्यांची संख्या असेल आणि अशा पद्धतीने निवडलेले असतील :

परंतु सल्लागार समितीमध्ये मालक, कामगार आणि राज्य विधानमंडळ यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांची संख्या समान असेल आणि राज्य शासनाने प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांची संख्यात तिच्या एकूण सदस्य संख्येच्या एक-चतुर्थांपेक्षा अधिक असणार नाही.

(३) सल्लागार समितीचा अध्यक्ष हा राज्य शासनाने प्रतिनिधित्व करण्यासाठी नियुक्त केलेल्या आणि राज्य शासनाने या बाबतीत नामनिर्देशित केलेल्या सदस्यांपैकी एक सदस्य असेल.

(४) सल्लागार समितीवरील सर्व सदस्यांची नावे राज्य शासकीय **राजपत्रात** प्रसिद्ध करेल.

**१०.** (१) मंडळ या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही योजनेच्या प्रयोजनार्थ, विहित अर्हता धारण करणाऱ्या त्याला योग्य वाटेल अशा व्यक्तींची निरीक्षक म्हणून नियुक्ती करील आणि त्यांच्या अधिकारितेच्या मर्यादा निश्चित करील. निरीक्षक आणि त्यांचे अधिकार.

(२) याबाबत महाराष्ट्र शासनाने केलेल्या कोणत्याही नियमांच्या बाबतीत, निरीक्षक,—

(अ) यंत्रमाग कामगार जिथे काम करतात त्या कोणत्याही जागी किंवा ठिकाणी, नोंदवह्या, पगाराचे अभिलेख इत्यादींची तपासणी करण्यासाठी सहायकांसह कोणत्याही वेळी प्रवेश करू शकेल आणि पहाणी करू शकेल आणि तपासणीसाठी ते सादर करण्यास फर्मावू शकेल.

(ब) यंत्रमाग कामगार किंवा यंत्रमाग कामगारांचा गट यांना काम देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस ज्यांना काम दिलेले आहे अशा व्यक्तींची नावे व पत्ते यांच्या संबंधात आणि उक्त कामासाठी केलेली किंवा कारावयाची प्रदाने यांच्या बाबतीत तिच्या अधिकारात ती देऊ शकत असेल आणि कोणतीही माहिती फर्मावू शकेल.

(क) मालकाने या अधिनियमाखालील किंवा योजनेखालील एखादा अपराध केला आहे असे त्यास संयुक्तिक कारणावरून वाटले तर, त्या अपराधाच्या बाबतीत त्यास संबंधित वाटत असेल अशा नोंदवह्या, पगाराचे अभिलेख किंवा त्याच्या नोटिशी किंवा त्याचे भाग जप्त करू शकेल किंवा त्याच्या प्रती काढू शकेल.

(३) या कलमखाली नियुक्त करण्यात आलेला प्रत्येक निरीक्षक हा भारतीय दंड संहितेच्या कलम २१ नुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

**११.** हा अधिनियम किंवा योजना याखाली शिक्षापात्र असलेल्या प्रत्येक अपराधाची, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक हद्दीमध्ये अपराध झालेला आहे, त्या कामगार न्यायालयाकडून न्याय चौकशी करण्यात येईल. कामगार न्यायालयाने अपराधांची न्याय चौकशी करणे.

**११अ.** कोणतेही कामगार न्यायालय, निरीक्षकाने किंवा मंडळाकडून किंवा महाराष्ट्र शासनाकडून याबाबतीत विशेष रितीने प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीने केलेल्या लेखी तक्रारीवरून असलेल्या व्यतिरिक्त इतर बाबतीत या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधांची दखल घेणार नाही. तक्रारीवरून अपराधाची दखल घेणे.

**११ब.** कामगार न्यायालय, अधिनियमाखाली किंवा अधिनियमाद्वारे शिक्षापात्र असलेल्या अपराधाची त्याच्याकडे तक्रार केलेल्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत न्याय चौकशी करील व ती निकालात काढील. कामगार न्यायालयाने तीन महिन्यांच्या आत प्रकरणे निकालात काढणे.

**११क.** (१) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी,— कामगार न्यायालयाने औद्योगिक न्यायालयाकडे करावयाचे अपील.

(अ) कामगार न्यायालयाने ठरविलेल्या अपराधसिद्धीविरुद्ध सिद्धपराध व्यक्तीला,

(ब) कामगार न्यायालयाने ठरविलेल्या दोषमुक्तीविरुद्ध तक्रारदार व्यक्तीला,

(क) कामगार न्यायालयाने दिलेल्या शिक्षादेशात वाढ करण्यासाठी राज्य शासनाला औद्योगिक न्यायालयाकडे अपील करता येईल.

(२) यथास्थिती, अपराधसिद्धी, दोषमुक्ती किंवा शिक्षादेश यांच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत प्रत्येक अपील करण्यात येईल :

परंतु, औद्योगिक न्यायालय लेखी नमूद करावयाच्या पुरेशा कारणास्तव उक्त कालावधी संपल्यानंतरही त्यांच्याकडे असे अपील दाखल करून घेऊ शकेल.

(३) औद्योगिक न्यायालयात या अधिनियमाखाली त्यांच्याकडे केलेले अपील किंवा निदेश यांची त्यांच्याकडे असे अपील किंवा निदेश करण्यात आल्याच्या तारखेपासून शक्यतोवर तीन महिन्यांच्या आत सुनावणी करील व ते निकालात काढील.

(४) औद्योगिक न्यायालयाने दिलेला कोणताही निर्णय किंवा आदेश यावर दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयात आव्हान देता येणार नाही.

विवक्षित प्रकरणांमध्ये इतर कायद्यांखालील हक्क व विशेषाधिकार यांना बाधा पोहोचणार नाही.

**१२.** या अधिनियमाखालील कोणत्याही गोष्टीमुळे हा अधिनियम ज्या तारखेस अंमलात येईल त्या तारखेस अन्य कोणताही कायदा, कंत्राट, प्रथा किंवा रुढी याअन्वये अशा यंत्रमाग कामगाराला लागू होणारे यंत्रमाग कामगारांचे हक्क व विशेषाधिकार यांना, असे हक्क व विशेषाधिकार हे, हा अधिनियम व योजना या अन्वये त्याला जे हक्क व विशेषाधिकार मिळणार असतील त्यापेक्षा अधिक अनुकूल ठरत असतील तर बाधा पोहचणार नाही.

अपराधाकरिता सर्वसाधारण शास्ती.

**१३.** हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम याच्या कोणत्याही तरतुदींचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला, कामगार न्यायालय किंवा औद्योगिक न्यायालय यांच्याकडून तिला सिद्धपराध ठरविण्यात आल्यानंतर, दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल आणि असा भंग करणे चालू राहिले तर त्या बाबतीत, असा भंग चालू राहील त्या प्रत्येक दिवसाकरिता एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या अतिरिक्त द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येईल.

या अधिनियमाखाली केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.

**१४.** हा अधिनियम किंवा त्याखाली केलेली कोणतीही योजना किंवा कोणताही नियम किंवा आदेश यांच्या अनुरोधाने सद्‌भावनाने केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही गोष्टींमुळे राज्य शासन किंवा मंडळ किंवा मंडळाचा अथवा सल्लागार समितीचा अध्यक्ष, सचिव किंवा कोणताही सदस्य यांच्याविरुद्ध किंवा कोणताही निरीक्षक किंवा मंडळाचे अन्य कोणतेही अधिकारी यांच्या विरुद्ध कोणताही वाद, खटला किंवा अन्य कायदेशीर, कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**१५.** (१) राज्य शासनाला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींच्या अधीन राहून अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) या अधिनियमाखाली केलेली प्रत्येक योजना आणि त्या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एका अधिवेशनात अथवा दोन क्रमवर्ती अधिवेशने मिळून एकूण तीस दिवसांच्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात ते अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या योजनेत किंवा नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले किंवा ती योजना, तिची कोणतीही तरतूद किंवा तो नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहाचे मतैक्य झाले तर त्यांनी असा निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध केल्यावर, ती योजना किंवा ते नियम असा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा प्रकरणपरत्वे, मुळीच अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबद्दल किंवा विलोपन यामुळे त्यापूर्वी ती योजना, तरतूद किंवा यथास्थिती नियम याअन्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्रात जवळजवळ सात ते आठ लाख कामगार यंत्रमाग आस्थापनांमध्ये काम करतात. तथापि, यंत्रमाग आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या या कामगारांचे राहणीमान हलाखीचे असल्याचे आढळून आले आहे. विद्यमान कामगार कायद्यानुसार त्यांना पुरेसे संरक्षण आणि लाभ मिळत नाहीत. आणखी असे की अशा कामगारांना विविध कामगार कायदे लागू करणे अव्यवहार्य असून विद्यमान कायद्यांमध्ये सुधारणा करून त्यांच्या कामाचे आणि इतर परिस्थितीचे विनियमन करण्यामध्ये अडचणी आढळून आलेल्या आहेत.

म्हणून यंत्रमाग कामगारांची कामाच्या ठिकाणची आणि नोकरी संबंधातील स्थिती विशेष कायदे करून विनियमित करणे आवश्यक आहे. म्हणजे त्यायोगे ओढग्रस्तीचे जीवन कंठावे लागणाऱ्या या कामगारांना निर्वाणीची मदत पुरवण्यासाठी या बाबी मंडळाकडे सोपवता येतील.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २३ मे, २०२५.

**सुधीर मुनगंटीवार,**
प्रभारी सदस्य.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत.

**खंड १** (३).— या खंडाद्वारे, राज्य शासनास, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा दिनांकास हा अधिनियम अंमलात आणण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

**खंड ३**.— या खंडाद्वारे, यंत्रमाग कामगारांच्या नोकरीच्या शर्ती विनियमित करण्याकरिता आणि काही विवक्षित सोयी आणि सुविधा त्यांना पुरविण्याकरिता एक योजना तयार करण्याचे अधिकार राज्य शासनाला प्रदान करण्यात आले आहेत.

**खंड ४**(१).—या खंडाद्वारे, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे यंत्रमाग कामगार कल्याण मंडळ स्थापन करण्याचे अधिकार राज्य शासनाला प्रदान करण्यात आले आहेत.

**खंड ४**(५).—या खंडाद्वारे, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे मंडळाच्या सदस्यांची नावे प्रसिद्ध करण्याचे अधिकार राज्य शासनाला प्रदान करण्यात आले आहेत.

**खंड ९**(१).—या खंडाद्वारे, नियोक्त्याचे आणि यंत्रमाग कामगारांचे भविष्यनिर्वाह निधीमधील अंशदान, राज्य कामगार विमा योजना आणि यंत्रमाग कामगारांना द्यावयाची उपदानाची रक्कम आणि बोनस यांसारख्या बाबींसंबंधात सल्ला देण्यासाठी एक सल्लागार समिती स्थापन करण्यासाठी राज्य शासनाला अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

**खंड ९**(४).—या खंडाद्वारे, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे सल्लागार समितीच्या सदस्यांची नावे प्रसिद्ध, करण्याचे अधिकार राज्य शासनाला प्रदान करण्यात आले आहेत.

**खंड १५**.— या खंडाद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम करण्याचे अधिकार राज्य शासनाला प्रदान करण्यात आले आहेत.

२. वैधनिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वरील प्रस्ताव सामान्य स्वरूपाचे आहेत.

## वित्तीय ज्ञापन

**खंड ३** अन्वये यंत्रमाग कामगारांना विविध सुविधा व सुखसोयी उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे.

**खंड ४** नुसार यंत्रमाग कामगार कल्याण मंडळ स्थापण्याची तरतूद असून त्यातील विनिर्दिष्ट सदस्याला प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अदा करण्याची तरतूद आहे.

वरील नमूद तरतुदींसाठी राज्याच्या एकत्रित निधीमधून विवक्षित आवर्ती खर्च करावा लागेल तसेच राज्याच्या एकत्रित निधी मधून कराव्या लागणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाचा अंदाज या टप्प्यावर देता येणे शक्य नाही.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ०४ जुलै, २०२५.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.